सकाळ



**अकोलाः** कार्यक्रमात सहभागी सायबर वॉरियर्स क्लबचे सभासद

# 'शिवभक्ती–सायबर सुरक्षेची शक्ती' उपक्रम अकोल्यात उत्साहात संपन्न

**■ सकाळ वृत्तसेवा**

अकोला, ता.२०: शंकरलाल खांडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला यांच्या सहकार्याने क्विक हील आणि महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने "शिवभक्ती – सायबर सुरक्षेची शक्ती" हा विशेष जनजागृती उपक्रम श्री राजराजेश्वर मंदिर परिसरात भव्यदिव्य पद्धतीने पार पडला. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मागील वर्षी समन्वयक म्हणून काम पाहिलेले खरात सर यांचे योगदान उल्लेखनीय ठरले, तर यावर्षीच्या शिक्षक समन्वयक डॉ. दीप्ती पेटकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करून उपक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेतले.

कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. मागील वर्षी या उपक्रमाचे शिक्षक समन्वयक म्हणून कार्य केलेले खरात सर यांचे आणि यावर्षीच्या शिक्षक समन्वयक डॉ. दीप्ती पेटकर यांचे विशेष सहकार्य लाभले. विशेष म्हणजे, डॉ. दीप्ती पेटकर यांनी विद्यार्थ्यांना मोठ्या उत्साहाने मार्गदर्शन करून या उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग घडवून आणला. कार्यक्रमात रंगोली स्पर्धा, भगवान शंकरांची वंदना, सायबर सुरक्षा जनजागृतीपर भाषण, स्ट्रीट प्ले, नाटिका, थेट प्रात्यक्षिक, माहितीपत्रके व स्टिकर्सचे वितरण, तसेच "सायबर शिक्षणासाठी – सायबर संरक्षण" या विषयावर सामूहिक शपथ यांचा समावेश होता. सायबर वॉरियर्स क्लबमधील तब्बल २० समर्पित स्वयंसेवकांनी सकाळी ८.०० वाजल्यापासून रात्री १०.०० वाजेपर्यंत अविरत कार्य करून जनतेपर्यंत सायबर सुरक्षा संदेश पोहोचवले. या उपक्रमामध्ये १००० पेक्षा अधिक नागरिकांचा सहभाग झाला. सांस्कृतिक व धार्मिक वातावरणातून डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूक करण्याचा हा एक अनोखा उपक्रम ठरला.